सं.फौ.ख.क्र.८०२/२०२२

**<u>प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, दुसरे कोर्ट, शेगांव यांचे न्यायालयात</u>**

(श्रीमती व्ही.डी. साळवे यांचे समक्ष)

| | | | |
|---|---|---|---|
| १. | खटल्याचा अनुक्रमांक | :- | सं.फौ.ख.क्र.८०२/२०२२ |
| २. | गुन्हा घडल्याचा दिनांक | :- | २४.०९.२०२२, |
| ३. | फिर्यादी नोंदविल्याचा दिनांक | :- | २४.०९.२०२२, |
| ४. | फिर्यादीचे नाव | :- | पोलीस स्टेशन अधिकारी,<br>पोलीस स्टेशन,शेगांव ग्रामीण, |
| ५. | आरोपीचे नांव | :- | ज्ञानेश्वर सारंगधर नागे,<br>वयः ३५ वर्षे, धंदाः चालक,<br>रा. कारखेड,<br>ता. शेगांव, जि. बुलडाणा. |

६. गुन्हयाचा तपशील

हे की, दिनांक २४.०९.२०२२ रोजी १३.३० वाजताचे दरम्यान, शेगांव ते वरवट रोड वरील कालखेडा फाटा, ता. शेगांव, जि. बुलडाणा येथे सार्वजनिक ठिकाणी तुम्ही तुमच्या ताब्यातील वाहन ॲपे क्रमांक एम एच.२८-बी. ए.०२१० सार्वजनिक रस्त्यावर सर्व सामान्य जनतेच्या जिवीतास धोका निर्माण होईल व रहदारीस अडथळा होईल अशा प्रकारे उभे केले. म्हणून तुम्ही भारतीय दंड विधानाचे कलम २८३ अन्वये गुन्हा केला आहे. जो या न्यायालयाच्या अधिकार क्षेत्रात आहे.

७. **<u>आरोपीचे प्रतिकथन</u>**

प्रश्न :- तुम्हाला आरोप पत्राचे कागदपत्र मिळाले काय ?

उत्तर :- होय.

प्रश्न :- तुमच्यावर ठेवण्यात आलेले आरोप समजले काय ?

उत्तर :- होय

प्रश्न :- तुम्हाला गुन्हा कबुल आहे काय ?

उत्तर :- मला गुन्हा कबुल आहे.

.....................................

आरोपीची सही

दि. १७.१०.२०२२

स्वा/-

(श्रीमती व्ही. डी. साळवे)

प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी

दुसरे कोर्ट, शेगांव

सं.फौ.ख.क्र.८०२/२०२२

## कारणमिमांसा

प्रस्तुत प्रकरण आरोपीविरुध्द पोलीस स्टेशन, शेगांव ग्रामीण यांनी दाखल केले होते. आरोपी आज न्यायालयासमोर हजर झला असुन त्याने गुन्हा कबुल केला.

आरोपीला त्याचे वरील आरोप त्याचे भाषेत समजावुन सांगीतले असता त्याने इच्छा पुर्वक गुन्हा कबुल केला. त्याबाबत त्याने नि.क्र.२ वर पुरसीस दाखल केली. त्याला शिक्षेच्या मुद्यावर ऐकले असता त्याने दया दाखववी व कमीत कमी शिक्षा करण्यात यावी अशी विनंती केली. तो एकटा त्याचे घरात कमवता असल्याचे त्याचे घराची जबाबदारी त्याचे वर आहे. गुन्हाचे स्वरुप बघता व आरोपीचे कथन ऐकता खालील प्रमाणे आदेश पारीत करणे न्यायाच्या दृष्टीने योग्य होईलः–

## आदेश

आरोपी **ज्ञानेश्वर सारंगधर नागे,** रा.कालखेड, ता. शेगांव, जि. बुलडाणा यास फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम २५२ नुसार भारतीय दंड विधानाचे कलम २८३, चे गुन्हयात दोषी ठरवुन त्यास रक्कम रुपये २००/– (रक्कम रुपये दोनशे फक्त) दंड करण्यात येतो. दंडाची रक्कम न भरल्यास त्याने तीन दिवस साधी कैदेची शिक्षा भोगावी.

स्वा/–

दि. १७.१०.२०२२

(श्रीमती व्ही. डी. साळवे)
प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी
दुसरे कोर्ट, शेगांव

सं.फौ.ख.क्र.८०२/२०२२

प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, पी.डी.एफ. फाईल मधील मजकुर शब्द न शब्द मुळ निकालाप्रमाणे आहे.

लघुलेखकाचे नांवः– के.एस.देशमुख,लघुलेखक ग्रेड–३(तदर्थ )

न्यायालयाचे नांवः– न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, दुसरे कोर्ट, शेगांव

दिनांकः–१७.१०.२०२२